ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ३० मे, १९५१ अंक २२

## विविध माहिती

**राजस्थानांतील सहकारी चळवळ**— राजस्थान सरकारनें आपल्या राज्यांतील सहकारी चळवळीला उत्तेजन देण्यासाठीं म्हणून निरनिराळ्या सहकारी संस्थांना मिळून २१,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ही रक्कम विहिरींची दुरुस्ती, घरें बांधणें आणि गुदामे बांधणें ह्यांवर खर्च होणार आहे.

**तागाची जागा घेणारी नवी वनस्पति**— अमेरिकेंतील शेती-संशोधकांनीं तागाचें काम करूं शकणाऱ्या एका वनस्पतीचा शोध लावला आहे असें समजतें. ह्या वनस्पतीचें नांव 'केनाफ' असें असून ती मुळांत भारतांत सांपडली असें म्हणतात. फारशी मशागत न करतां ही वनस्पति झपाट्यानें वाढते. लागवड मुख्यतः क्यूबांत करण्यांत येते.

**कॅनरा बँक**— कॅनरा बँकेच्या मालवण येथील बँकेंतील कांहीं दिवसांपूर्वीं पडलेल्या दरोड्यांतील सर्व रोकड व डागडागिने सांपडल्याचें समजतें. बँकेच्या वतीनें एक आश्वासनपर पत्रक काढण्यांत आलें असून ठेवीदार व संबंधी लोकांचें नुकसान न होण्याची दक्षता बँकेकडून घेण्यांत येत आहे असें त्यांना कळविण्यांत आलें आहे.

**लक्ष्मी बँकेचा वाढदिवस**— फलटण येथील श्री लक्ष्मी बँकेचा २५ वा वाढदिवस मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १ जूनला साजरा होणार आहे. ह्या प्रसंगीं संस्थेचा इतिहास प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. स्थानिक विणकरांना सूत पुरविण्याचा परवाना बँकला मिळालेला आहे; त्याप्रमाणें सुताचें वाटप सुरू झालें आहे.

**फोर्डच्या कारखान्यांत नोकर कपात**— सुप्रसिद्ध अमेरिकन कारखानदार फोर्ड ह्यांच्या मोटारीच्या कारखान्यांतील सुमारें १०,००० मजुरांना पुढील दोन महिन्यांत कामावरून कमी करण्यांत येणार आहे. सरकारनें कच्च्या मालाच्या वापरांवर जीं नियंत्रणें घातलीं आहेत त्यामुळें हा निर्णय कारखान्याच्या चालकांना घ्यावा लागत आहे.

**युरोपमध्यें रशिआच्या मोटारी**—प. युरोपांतील बाजारपेठेंत सो. रशिआंत तयार झालेल्या 'मॉस्कोव्हिच १०' ह्या गाड्या विक्रीसाठीं आल्या आहेत. त्यांच्या एंजिनाची ताकद १० अश्वशक्ति आहे व त्यांची किंमत सुमारें ३५० पौंड आहे. ह्या गाडीमुळें युरोपांतील ब्रिटिश बनावटीच्या गाड्यांच्या विक्रीला धोका उत्पन्न झाला आहे. गाडी जर्मन बनावटीच्या 'ओपेल' सारखी असून एका गॅलनवर ३७ मैल जाते.

**गुन्ह्याच्या तपासासाठीं पोपटाची मुलाखत**—लंडनमधील गुप्त पोलिस एका चोरीचा शोध लावण्यासाठीं एका पोपटाचे शब्द ऐकण्याची खटपट करीत आहेत. ज्या दुकानांत चोरी झाली त्या दुकानांतच हा पोपट होता. चोरांनीं गुन्हा करतांना कांहीं बोलणें केलें असल्यास ते शब्द हा पोपट उच्चारून दाखवील अशी पोलिसांना आशा वाटत आहे. कारण, हा पोपट आवाजाची नक्कल करण्यांत फारच पटाईत आहे.

**गोमयापासून सुगंधी अत्तर**— स्वित्झरलंडमधील एका रसायनशास्त्रज्ञानें गाईच्या शेणापासून सुगंधी अत्तर तयार करण्याचा शोध लावला आहे असें समजतें. एका अमेरिकन कंपनीनें ह्या शोधासंबंधीं खात्री करून घेऊन तो विकत घेण्याची तयारी दाखविली आहे.

**प्राप्तीवर कर भरण्यास लावण्यासाठीं व्यंगचित्रें**—प्राप्तीवरील कराचे कागदपत्रांवर व्यंगचित्रें छापून ते अधिक आकर्षक करण्याचा प्रयोग ब्रिटिश सरकारनें चालू केला आहे. सरकार आपलें उत्पन्न कसें मिळवितें आणि त्याचा व्यय कसा करतें हें व्यंगचित्रांच्या साह्यानें दाखविण्यांत आलेलें आहे. खरेदी करणाऱ्या एका बाईच्या व्यंगचित्राच्या साह्यानें कापडावरील खरेदीकराचें उत्पन्न दाखविण्यांत आलें आहे. दारूवरील कराचें उत्पन्न दाखविणाऱ्या व्यंगचित्रांत एक मनुष्य बीर पितांना दाखविला आहे.

**ब्रिटनची सायकलींची निर्यात**— १९५१ च्या पहिल्या तिमाहींत ब्रिटिश कारखानदारांनीं सुमारें ६४,००,००० पौंड किंमतीच्या सायकली व मोटार सायकली परदेशांत निर्यात केल्या. १९५० च्या सरासरी निर्यातीपेक्षां हा आंकडा ८,००,००० पौंडांनीं अधिक आहे. मलायानें सर्वांत अधिक सायकली विकत घेतल्या. त्यानंतर ब्राझिल, भारत, ब्रिटिश वेस्ट आफ्रिका, पाकिस्तान व अमेरिका असा अनुक्रम लागतो.

**मुंबईंत जादा टेलिफोन्स**—स्वतःच्या मालकीचे टेलिफोन्स देण्याच्या योजनेपैकीं २,००० टेलिफोन्स अजून द्यावयाचे शिल्लक उरले आहेत. हे टेलिफोन्स १९५१ अखेर देण्यांत येतील. मुंबईमध्यें १९५० सालीं १९०० नवे टेलिफोन्स वरील योजनेप्रमाणें देण्यांत आले.

**तंबाखूवर विक्रीकर**— संयुक्तप्रांत सरकारनें तंबाखूवर रुपयामागें ३ पै कर घेण्यास सुरवात केली आहे. राज्याच्या उत्पन्नांत ह्या कराच्या वसुलीमुळें २ लाख रुपयांची भर पडेल असा अंदाज आहे.

## मध्यभारतामधील उद्योगधंदे

मध्यभारत सरकारच्या उद्योग आणि व्यापार खात्यानें राज्यांतील उद्योगधंद्यांची माहिती देणारी एक छोटी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. मध्यभारताचें क्षेत्रफळ आणि लोकसंख्या ह्यांचा विचार करतां राज्याचा औद्योगिक दर्जा मुंबई–राज्याच्या खालोखाल आहे असें पुस्तिकेंत नमूद करण्यांत आलें आहे.

१९५० मध्यें मध्यभारतामधील कापडाच्या गिरण्यांनीं १,६७,९२० गांठी कापड निर्माण केलें. हें उत्पादन १९४९ सालांतील उत्पादनाच्या मानानें ७ टक्के अधिक आहे. भारतामधील कापडाच्या एकूण उत्पादनापैकीं ६ टक्के उत्पादन मध्यभारतांत होतें. एकूण गिरण्यांची संख्या १५ असून त्यापैकीं १३ गिरण्या सूत व कापड दोन्ही उत्पादन करतात. सर्व गिरण्यांत मिळून चात्यांची संख्या ३.६५,२५४ आहे आणि मागांची संख्या १०, ६३० आहे. साखरेचे पांच कारखाने आहेत. सर्व कारखान्यांतून मिळून रोज २,४०० टन ऊंस गाळला जातो. निरनिराळ्या प्रकारचे कारखाने ८४ आहेत. त्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें ६०,००० मण होतें. वनस्पति तुपाचा एक कारखानाहि नुकतांच निघाला आहे. ग्वाल्हेर येथें एक सिमेंटचा कारखाना आहे. ह्या कारखान्यांत दरवर्षीं सुमारें ६०,००० टन सिमेंट तयार होऊं शकतें. ह्याशिवाय ३ कांचेचे कारखाने आणि तीन सरकारी मालकीचे कारखाने आहेत. ग्वाल्हेरच्या चिनी मातीच्या भांड्याचा कारखाना व कातड्याच्या वस्तूंचा कारखान हे सरकाच्या मालकीचे आहेत. तिसरा कारखाना 'टेक्समॅको' हा एंजिनिअरिंग कारखाना आहे. ह्या कारखान्याचा वार्षिक उलाढाल २७ लाख रुपयांपर्यंत होते. 'टेक्स मॅको' कारखान्यांत कापडाचे माग तयार होतात. अगदीं नवीन पद्धतीचे स्वयंचलित माग तयार करण्यास कारखान्यानें नुकतांच आरंभ केला आहे.

आपल्या राज्यांतील उद्योगधंद्यांची वाढ व्हावी म्हणून सरकार सर्व प्रकारचें उत्तेजन देण्याची तत्परता दाखवीत आहे. नवीन निघणाऱ्या कारखान्यांना भांडवल पुरविण्यांतहि सरकार मागें नाहीं. आतांपर्यंत सुमारें ३४ लाख रुपयांचें भांडवल सरकारनें पुरविलें आहे. नवीन निघूं पहाणाऱ्या कारखान्यांत एक बिस्किटाचा कारखाना, एक डिझेल एंजिनाचा कारखाना आणि एक सुताची गिरणी, असे तीन कारखाने आहेत. एंजिनाचा कारखाना उभारण्याच्या कामीं जपानच्या कारखानदारांची मदत मिळविण्यांत आली आहे. सुताच्या गिरणींत दरवर्षीं सुमारें १० लक्ष वार सूत निर्माण करण्यांत येईल. सरकारच्या उद्योगखात्यानें पॉवर अल्कोहल, कागद, जड रसायनें इत्यादींचे कारखाने काढण्याच्या योजना तयार केल्या आहेत. मध्यभारतांत दोन वीजकेंद्रेंहि उभारण्यांत येणार आहेत. हीं दोन केंद्रें उभीं राहिलीं म्हणजे मध्य भारताच्या औद्योगिक विकासाला लागणारी औद्योगिक शक्ति मिळूं शकेल आणि उद्योगधंद्यांच्या वाढीला जोराची चालना मिळेल असा अंदाज आहे.

---

### पुणें सें. को. बँकेच्या खेड शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सेंट्रल को. बँकेच्या खेड शाखेचा रौप्यमहोत्सव खेड येथें शनिवार, दि. २ जून १९५१ रोजीं दुपारीं २ वाजतां श्री. वैकुंठराय मेहता अर्थ–सहकार मंत्री, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे.

फोनः ३४५११ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन-
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.

**दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

९ बेंक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

**१५ जिल्ह्यांत ६५ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. ३० मे, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांनीं दिलेल्या कर्जांची छाननी

### हिंदी बँकांचें कारखानदारीस सहाय्य

हिंदी बँकांनीं दिलेल्या कर्जांची तपशीलवार पहाणी रिझर्व्ह बँक करूं लागली आहे. जून, सप्टेंबर आणि डिसेंबर १९४९ अखेरच्या आंकड्यांची तिनें केलेली छाननी प्रसिद्ध झाली आहे, ती मोठी उद्‌बोधक आहे. बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जांपैकीं निम्मीं कर्जें व्यापारासाठीं आणि एक तृतीयांश कर्जें कारखानदारीसाठी आहेत, असें त्या छाननीवरून आढळून येतें; शेतीच्या व्यवसायाला उपयोगी पडणारीं कर्जें जवळ जवळ नाहींतच. सर्व बँकांच्या एकूण कर्जांपैकीं ८७% कर्जें तारणावरील होतीं आणि १% पेक्षांहि कमी कर्जें बुडीत वा संशयित होतीं. तारण न घेतां दिलेल्या कर्जांपैकीं एक चतुर्थांश, हुंड्यांवर दिलेलीं होतीं. प्रत्यक्ष माल व मालाचे व्यवहारांवर आधारलेलीं बिलें ह्यांच्या मालकीचे तारणावर दिलेल्या कर्जांची रक्कम एकूण कर्जांच्या निम्मी भरली. सरकारी रोखे व शेअर्स ह्यांचा तारणावरील कर्जांचा वांटा एक चतुर्थांशाइतका होता आणि घरें वगैरेंचे तारणावरील कर्जें ६% एवढींच होतीं.

कारखानदारीस दिलेल्या कर्जांचा आकडा १३८ कोटी ते १५९ कोटी रु. इतका होता; म्हणजे एकूण कर्जांच्या तो २९% ते ३२% होता. ग्रेट ब्रिटनमधील व ऑस्ट्रेलियांतील तत्सम प्रमाण २०% व २४% आहे. कारखानदारीस बँकांनीं जी रक्कम कर्जाऊ दिली, ती कारखान्यांना खेळत्या भांडवलासाठी उपयोगी पडली हें उघड आहे. अप्रत्यक्ष रीतीनेंहि कारखान्यांना बँकांकडून कर्ज मिळतें. कारखानदारीस बँकांनीं दिलेल्या कर्जांपैकीं निम्मीं कर्जें कपास-कापड, ताग आणि साखर ह्यांच्या कारखान्यांना दिलेलीं होतीं. बिगर-शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत उत्पादक कार्यापेक्षां अनुत्पादक कार्यास दिलेल्या कर्जांचा भरणा ज्यास्त आढळतो.

जपानमधील बँका कारखानदारीस सर्वांत जास्त मदत करतात आणि त्याचेनंतर अमेरिका, भारत, ग्रेटब्रिटन व ऑस्ट्रेलिया ह्यांचा अनुक्रम लागतो. व्यापारविषयक कर्जांचें प्रमाण भारतांत सर्वांत जास्त आहे. शेतीस ऑस्ट्रेलियन बँका सर्वांत जास्त प्रमाणांत कर्जें देतात आणि वैयक्तिक व व्यावसायिक कर्जांचा भरणा ग्रेट ब्रिटनमध्यें सर्वांत अधिक आहे.

**बँकांच्या कर्जांची प्रमुख देशवार वर्गवारी**

| | भारत | ग्रेटब्रिटन | ऑस्ट्रेलिया | अमेरिका | जपान |
|---|---|---|---|---|---|
| कारखानदारी | ३१·५ | २७·० | २४ | ५५·५ | ६९·४ |
| व्यापार | ४७·८ | २१·६ | २५ | ३५·४ | २३·६ |
| शेती | ३·८ | ९·० | २५ | ... | ३·२ |
| वैयक्तिक | ८·९ | ३०·९ | १८ | ३·७ | २·८ |
| इतर | ८·१ | ११·५ | ९ | ५·४ | १·४ |
| एकूण | १००·० | १००·० | १०० | १००·० | १००·० |

बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जांचें त्यांचेकडील एकूण ठेवींशीं प्रमाण १९४९-५० मध्यें ५१% होतें. ग्रेटब्रिटनमध्यें तें ४१%, अमेरिकेंत ३१% ऑस्ट्रेलियांत ४७%, कॅनडांत ३५% व दक्षिण आफ्रिकेंत ४२% होतें. बँकांनीं दिलेलीं कर्जें व्यापार व कारखानदारी ह्यांच्या गरजा भागविण्यास पुरेशी आहेत किंवा नाहीं, हें रिझर्व्ह बँकेच्या पहाणीवरून समजन येण्यास मार्ग नाहीं. परंतु इतर देशांशीं तुलना केली, तर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानानें बँकांनीं दिलेलीं कर्जें भारतांत फारच कमी प्रमाणांत आहेत असें आढळून येतें. खालील तक्ता हें स्पष्ट करील:—

**राष्ट्रीय उत्पन्न व बँकांचीं कर्जें**

| | १ | २ | ३ |
|---|---|---|---|
| | १९४९ मधील राष्ट्रीय उत्पन्न | दिलेलीं कर्जें १९४९ अखेर | २ चे १ शीं प्रमाण % |
| | (आकडे प्रत्येक राष्ट्रीय चलनांतील कोटींचे) | | |
| अमेरिकन ($) | २१६८३ | ४२९६ | १९·८ |
| ग्रेटब्रिटन (£) | १०४२ | २६३ | २५·३ |
| ऑस्ट्रेलिया (£A) | १८९ | ४० | २१·४ |
| कनडा (C$) | १२९७ | २६८ | २०·७ |
| भारत (रु.) | ९३२० | ४४१ | ४·७ |

## ऑक्सफर्ड येथील शेती-सहकार परिषद

**प्रांतिक सहकारी बँकेचे वतीनें श्री. गायतोंडे जाणार**

ग्रेटब्रिटनमधील "फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन," प्रदर्शनाच्या अनुषंगानें शेतीविषयक सहकाराची एक कॉमनवेल्थ परिषद ऑक्सफर्ड येथें २४, २५, २६ व २७ जुलै १९५१ ह्या दिवशीं भरविण्यांत येणार आहे. परिषदेचें स्वरूप चर्चात्मक राहील. ब्रिटिश आइल्स फेडरेशन ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेटिव्हजनें ही परिषद बोलाविलेली आहे. अशाच प्रकारची पहिली परिषद वेंब्ले प्रदर्शनाचे वेळीं (१९२४) व दुसरी परिषद एंपायर प्रदर्शनाचे वेळीं (१९३८) ग्लासगो येथें भरविण्यांत आली होती. १९३८ च्या परिषदेस उपस्थित असलेल्या २७७ प्रतिनिधींपैकीं एकतृतीयांश ब्रिटिश साम्राज्यांतील देशांतून आलेले होते व बाकीचे ब्रिटिश होते. येत्या जुलैमधील परिषद ऑक्सफर्ड येथील मिल्नर हॉलमध्यें भरणार आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एका कॉलेजांत २०० प्रतिनिधींची उतरण्याची-रहाण्याची व्यवस्था केली जाईल, आणि ४०० प्रतिनिधींची जेवणाची व्यवस्था होईल. पांच दिवसांसाठी प्रतिनिधींना रहाण्याचा व जेवणाचा प्रत्येकीं ५ पौंड, १५ शिलिंग खर्च येईल.

ऑक्सफर्ड येथील ह्या परिषदेस मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे वतीनें जाण्यासाठी श्री. वाय. वी. गायतोंडे, बँकेचे मॅनेजर, ह्यांची योजना बँकेनें केली आहे असें समजतें. ह्याबद्दल आम्हीं श्री. गायतोंडे ह्यांचें अभिनंदन करतों.

## दि बँक ऑफ कोंकण लि., मालवण

दि बँक ऑफ कोंकण लि. ला १९५० ह्या वर्षी १८,६१२ रु. नफा झाला. मागील वर्षांतील शिलकी नफा (७,२९८ रु.) त्यांत मिळविले, म्हणजे नफावाटणीस २५,९११ रु. येतात. रिझर्व्ह फंड ४,००० रु, कराची तरतूद १२,००० रु., बुडीत व संशयित कर्ज तरतूद ५,००० रु., इन्व्हेस्टमेंट फ्लु. रिझर्व्ह २,००० रु, अशी वाटणी करण्यांत आली. विक्रीस न काढलेल्या शेअर्सपैकीं २३ लक्ष रुपयांचे २५,००० शेअर्स वर्षाचे शेवटचे तिमाहींत विक्रीस काढण्यांत आले त्यापैकीं अहवालाचे वर्षअखेर २५८ शेअर्स खपून त्यांची पूर्ण रक्कम जमा झाली. रिपोर्टाचे तारखेपर्यंत (१६-३-१९५१) आणखी ३१८ शेअर्सचे ३,१८० रु. जमा झाले. कोंकणांतील जनता, विशेषतः व्यापारी वर्ग, ह्यांचेकडून बँकेस वाढत्या प्रमाणावर सहकार्य मिळत आहे. त्याचा उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. डायरेक्टरांनीं अहवालाचे वर्षीं बोर्डाच्या किंवा कमिटयांच्या सभांस हजर राहण्यासाठीं कांहींहि फी घेतलेली नाहीं. बँकेची मुख्य कचेरी मालवण येथें असून तिच्या मुंबई, पनवेल, रत्नागिरी, वेंगुर्लें, कुडाळ, सावंतवाडी व बांदा येथें शाखा आहेत. बँकेची मुंबई येथें शाखा असल्यामुळें, बँकिंग कंपनी कायद्याच्या ११ व्या कलमाप्रमाणें तिचें वसूल भांडवल व रिझर्व्ह मिळून ५ लक्ष रु. अधिक प्रत्येक कचेरीसाठीं २५ हजार रुपये. इतके असावयास पाहिजेत. म्हणून बँकेच्या चालकांना एकूण खेळत्या भांडवलाच्या मानानें बँकिंगच्या दृष्टीनें आणखी शेअर भांडवलाची आवश्यकता नसतांहि शेअर्स विकून कायद्याच्या तरतुदींत येण्यासाठीं प्रयत्न करावा लागत आहे. त्या प्रयत्नांस यशहि येत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

**संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,०२,५८० | कॅश | २,५९,९८४ |
| रि. व इतर फंड | १४,५१५ | बिल्स डि. प. | १,५७,५६६ |
| ठेवी | २२,२७,३७३ | इन्व्हेस्टमेंटस | ११,५९,७४८ |
| नफा | १८,६१२ | कर्जे | १०,३३,९४९ |

## धान्य-वांटप-योजना

१९५० मधील सरकारी आयात-निर्गत

(आकडे हजार मणांचे आहेत)

| राज्य | आयात वांटा | निर्यात वांटा |
|---|---|---|
| आसाम | २४ | — |
| पश्चिम बंगाल | ४०० | — |
| बिहार | ६०० | — |
| ओरिसा | १० | ३५ |
| मद्रास | ५०० | — |
| मुंबई | ८०० | — |
| मध्यप्रदेश | २५० | ५० |
| उत्तरप्रदेश | २०० | — |
| पंजाब | — | १०० |
| काश्मीर | २० | — |
| पेप्सू | — | १०० |
| दिल्ली | १५६ | — |
| राज्यस्थान | — | — |
| अजमीर | ३५ | — |
| मध्यभारत | — | ५० |
| भोपाळ | — | १० |
| विंध्यप्रदेश | — | — |
| कच्छ | २० | — |
| सौराष्ट्र | ५० | — |
| हैद्राबाद | ८५ | — |
| म्हैसूर | ७५ | — |
| कूर्ग | — | १० |
| त्रावणकोर कोचीन | ३२५ | — |
| संरक्षण खातें, कोळसा-खाणी इतर | २५० | — |
| एकूण | ३,८४० | ३५५ |


## हिंद फायनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड.

इंडियन कंपन्यांच्या कायद्याखालीं नोंदलेली.

नोंदलेलें संक्षिप्त नांव : हिंदफिन

**धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर १.**

**विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००**

**रु. ५० च्या दर्शनी किंमतीच्या १०,००० हिश्श्यांत विभागलेलें.**

मुख्य उद्देशः—उद्योगधंदे व इतर कार्यासाठीं योग्य व्याजाच्या दरानीं आर्थिक मदत देणें. तसेंच सोनें, चांदी व इतर मौल्यवान धातू व जवाहीर ह्यांचे दागदागिने तयार करणें, विकणें, व गहाण ठेवून घेणें. घरें बांधण्यासाठीं अथवा खरेदी करण्यासाठीं लांब मुदतीचें कर्जें देणें, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बांधून अथवा भाड्यानें घेऊन, लोकांच्या मौल्यवान वस्तू ठेवून घेणें. लहान प्रमाणांवर चालवतां येण्यासारखे धंदे स्थापन करणें, वगैरे वगैरे.

अध्यक्षः—श्रीमंत पूर्णचंद्रराव गोपाळराव बुटी.

**हिस्सेदारांच्या ठेवी अत्यंत आकर्षक दरानें घेतल्या जातील.**

**गरजू हिस्सेदारांना तारण घेऊन सोईवार अटींवर कर्ज दिलें जाईल.**

कंपनीचे हिस्से लवकर खरेदी करून कंपनीकडून मिळणारे अनेक फायदे मिळवा.

अर्जाचे फॉर्म व त्रोटक माहितीपत्रक मागवून घ्या.

हिस्से विक्रीसाठीं सन्मान्य, अनुभवी व वजनदार एजंट पाहिजेत.

**भोंसुले, श्रोती आणि कं.,** *मॅनेजिंग एजंट्स.*

## हिरडा: जागतिक महत्त्वाचा औद्योगिक कच्चा माल

ले.:—श्री. के. तवनाप्पा, बेळगांव

अखिल भारतांतील हिरड्याची पैदास, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार, वाहतूक वगैरेसंबंधीं आंकडेवार माहिती अर्थाच्या ता. २० डिसेंबर, १९४४च्या अंकांतून येऊन गेली आहे. जनतेनें व सरकारनें राष्ट्राच्या नैसर्गिक साधन-संपत्तीचा कमींत कमी वेळांत अधिकांत अधिक कार्यक्षमतेनें संरक्षण, संवर्धन व उपयोग करून घेण्यावरच बेकारीस आळा घालण्याचें व सामान्य जनतेचें राहणीमान उंचावण्याचें अवलंबून आहे.

गेल्या १० वर्षांत जळाऊ लांकडास येत चाललेल्या भरमसाट किंमतीचा परिणाम होऊन म्हणा किंवा या झाडांची मालकी कोणाची असा प्रश्न उद्भवल्यामुळें म्हणा हिरड्याच्या झाडांची तोड सर्वत्र अव्याहत चालू आहे. त्यामुळें आतांच केवळ बेळगांव जिल्ह्याचें हिरड्याचें सालिना पीक ६।७ हजार टनांवरून घटत ३।४ हजार टनांवर आलें आहे आणि हिरड्याची ही तोड अशीच चालू राहिल्यास तें पुढील ५।१० वर्षांत १॥-२ हजार टनांवर येणें अशक्य नाहीं. थोड्या फार फरकानें प्रांतांत सर्वत्र हीच परिस्थिति आहे. कच्च्या मालाच्या बाबतींत आमच्या देशावर निसर्गाची कृपा फार आहे असें म्हणतात. फक्त हिरड्याचा विचार केल्यास हिरडा परदेशीं पाठविल्यामुळें लाखों रुपये किंमतीचें डॉलरसारखें दुर्लभ व इतर सुलभ परराष्ट्रीय चलन आम्हांस सालीना मिळतें. हा माल परराष्ट्रास पोंहचविण्याचें बोटीचें भाडें १ कोटि रुपयांहून अधिक होतें शिवाय देशांत रेल्वेचें भाडें, जंगलांत माल गोळा करण्याची मजुरी, गाडीभाडें, हमाली, झाडांच्या मालकांना रॉयल्टी वगैरे स्वरूपांत कोटींनीं रक्कम मिळते. अशा प्रकारच्या या कल्पवृक्षाची कत्तल सरसहा होत आहे. कूळकायदे, इनामदारीचें नियंत्रण, कौरेसारख्या कायद्यांच्या भीतीमुळें असो अगर एकदम पैसा मिळविण्याच्या लोभानें असो, अनेक जहागीरदार, इनामदार लोकांनीं आपल्या हद्दींतील हिरड्यांचीं सर्वच्या सर्व झाडें तोडून टाकलीं त्यांच्या जोडीस खंडकरी, जमीनदार व कांहीं शेतकऱ्यांनींहि ही तोड चालू ठेवली आहे.

नुकतेंच मुंबई सरकारनें राज्यांत हिरड्याच्या अर्कांचे (एक्सट्रॅक्ट) कारखाने काढूं इच्छिणारांनीं आपली योजना व आपणांस हव्या असलेल्या सवलती व अटी, चीफ कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट, पुणें यांना कळवाव्या असें जाहीर केलें आहे. सरकारनें टाकलेलें हें पाऊल योग्यच आहे. परंतु सरकारनें याबरोबरच हजारों लोकांच्या योगक्षेमास हातभार लावणाऱ्या या नैसर्गिक संपत्तीचा होत असलेला ऱ्हास थांबवावा. मूठभर झाड-मालकांना सालीना झऱ्याप्रमाणें त्यांचा मोबदला मिळत असतां व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं त्यांना मोकाटपणें या झाडांची तोड करूं देणें अन्यायाचें आहे. यामुळें हिरड्याच्या उद्योगावर पोट भरणाऱ्या जनतेवर अन्याय होणार आहे! आणि पर्यायानें राष्ट्राच्या संपत्तीचाहि ऱ्हास होणार आहे. त्याकरितां सरकारनें वटहुकूम काढून हिरड्याची तोड थांबविली पाहिजे.

### हिरडा गाळण्याचे कारखानदारांस पुणें व बेळगांव जिल्ह्यांत अनुकूलता

आपल्या देशांत व परदेशांत किंबहुना पंचखंडांत गुरांची कातडीं कमाविण्याकरितां व रंगाकरितां सृष्टिनिर्मित वनस्पति भांडारांतील इतर जिनसांबरोबर भारतांतील हिरड्याचाहि वापर होत असतो.

कातडें कमाविण्याच्या धंद्याचें शास्त्र, पदार्थ विज्ञान-शास्त्र, रसायन शास्त्र, प्राणि-शास्त्र, जंतु-शास्त्र, वगैरे शास्त्रांशीं निगडीत असून तें समजाऊन सांगणें सोपें नाहीं. तथापि येथें तें सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शास्त्रीय शब्दांत कातड्याचें पृथःकरण द्यावयाचें म्हणजे विविध जातींच्या प्रथीनांचा (प्रोटीन्स) तो एक गुच्छ म्हणतां येईल. हीं प्रथीनें आणि हिरडा वगैरे फळांतून व कांहीं झाडांच्या सालींतून निघणारा तुरट रस म्हणजे टॅनीन, हीं विशिष्ट रासायनिक क्रियेनें एकजीव करणें म्हणजेच कातडें कमावणें (टॅनिंग) होय.

वनस्पति सृष्टींतील क्लिष्ट सेंद्रीय पदार्थांतील तुरट द्रव्यें (टॅनीन) हीं जगांतील सर्व भागांत कमी अधिक प्रमाणांत फळें, पानें, साली, मुळें, फांद्या, वगैरेंतून मिळतात व त्यांच्या कॅचोल आणि पायरोगॅलोल अशा दोन प्रमुख जाती आहेत. हिरड्याचें टॅनीन दुसऱ्या वर्गांत मोडतें.

मुंबई प्रांतांत पिकणाऱ्या हिरड्यांत शें. ३५ टक्के टॅनीन व १५ टक्के पाण्यांत मिसळणारा (Soluble) नॉन-टॅनीन आणि इतर ५० टक्के पाण्यांत न मिसळणारा भाग असल्यानें स्वाभाविकपणें येथील माल देशांतील व परदेशांतील बाजारपेठेंत पाठवितांना येथील कारखानदारांना पृथःकरणावरून प्रत्येक १०० टनांतून ३५ टन टॅनीन कामास येतें. बाकी ६५ टन टाकाऊ गाळ राहतो. यामुळें वाहतुकीचा खर्च निष्कारण वाढून, हिरड्याला जागेवर जितकी किंमत मिळावी तितकी मिळत नाहीं. वाहतुकीच्या खर्चांत बचत करण्यासाठी कच्चा हिरडा बाजारपेठांना पाठविण्याऐवजी, उसाच्या रसाचा गूळ बनवितात, त्याप्रमाणें हिरड्याच्या रसापासून टॅनीनचे खडे बनवितां येतात. त्यामुळें हिरड्यांतील शक्य असलेला शें. ५० टक्के निरुपयोगी गाळ वेगळा केला जाऊन विरघळणाऱ्या घट्ट खड्यांमध्यें शें. ५५ ते ६० टक्के टॅनीन एकत्रित होईल.

सध्यां आमच्या देशांत अशा प्रकारचे कांहीं कारखाने नव्यानें झालेले व जुनेही अस्तित्वांत आहेत. हे सर्व कारखाने किफायतशीर आहेत.

कारखान्यांसाठी खालील गोष्टी लागतात. कच्च्या मालाचा स्थानिक पुरवठा, मजूर, पाणी, पॉवर युनिटला लागणारें जळण, योग्य प्रकारची जागा, कच्च्या व पक्या मालाची वहातूक करण्याच्या सोई, रेल्वे लाईननजिक पडणारें बंदर, वगैरे.

वरीलपैकीं जवळ जवळ सर्वच्या सर्व गोष्टी अनुकूळ असलेलें किंबहुना सध्यां आपल्या देशांत असलेल्या कोणत्याही हिरड्याच्या एक्सट्रॅक्ट (अर्क काढण्याचा कारखाना) फॅक्टरीला एकसमयावच्छेदेंकरून इतक्या सोई लाभलेल्या नाहींत असें ठिकाण बेळगांवहून फक्त १६ मैलांवर असलेल्या रेल्वेलाईनवर खानापूर स्टेशनापासून २-४ फर्लांगावर मलप्रभा नदीकाठीं युरोपियन कंपनीनें "मॉडर्न फॅक्टरी ले-आउट प्लॅन" प्रमाणें (आधुनिक पद्धतीनें) बांधलेली दारूभट्टी (डिस्टीलरी) ची इमारत असून सध्यां ती मुंबई सरकारच्या मालकीची आहे. रेल्वे-सायडिंगच्या सोईसह व पी. डब्ल्यु. डी. रोडपर्यंत जोडलेला पक्क्या सडीचा रस्ता, दगडी पक्क्या बांधणीच्या वखारी, ऑफिस व कामगारांसाठी घरें वगैरे सोयी असलेली जागा जर बेळगांवच्या नियोजित कारखान्यास भाडेपट्टीनें अगर मालकी हक्कानें खरेदी मिळाली तर तें कितीतरी सोईचें व फायद्याचें होणार आहे.

पुणें जिल्ह्यांत पूर्वीचे भोर स्टेट आतां विलीन झालेलें

आहे. सरकारी अंदाजाप्रमाणें सरकारच्या मालकीच्या जंगलांत खालीना होणाऱ्या हिरड्याच्या पिकाचें अंदाज खालीलप्रमाणें आहेत. पुणें विभाग १५ हजार पोतीं. पुणें जिल्ह्यांत समावेश झालेल्या भोर विभागांत ६५ हजार पोतीं. कुलाब्यामधील सुधागड तालुका भोर विभाग २० हजार पोतीं, म्हणजे एकूण प्रत्येकीं बंगाली दोन मण वजनाची एक लाख पोतीं सुमारें (७००० टन) माल होतो. सध्यां हा सर्व माल मुंबई मार्गें कांहीं प्रमाणांत देशांत व बाकीचा युरोप–अमेरिकेस रवाना होतो. पुणें जिल्ह्यांत एक्स-ट्रॅक्ट कारखान्याकरितां पुणें व भोर हीं दोन्हीं ठिकाणें सारख्याच सोईचीं आहेत.

वरील दोन्हीं ठिकाणीं स्वस्त व भरपूर प्रमाणांत विजेचा पुरवठा होऊं शकेल. यामुळें हिरड्याच्या सॉलीड एक्सट्रॅक्ट बरो-बरच "ड्राय स्प्रे प्रोसेसनें" डब्यांतून येणाऱ्या दुधाच्या भुकटी-प्रमाणें पावडरच्या स्वरूपांतही एक्सट्रॅक्ट बनवितां येईल.

२४ तासांच्या एका दिवसास ५ टन सॉलीड अगर पॉवडर एक्स्ट्रॅक्ट बनविणेसाठीं दोन्ही प्रकारच्या यंत्रसामुग्रीसह कंपलीट टॅन एक्सट्रॅक्ट प्लँट स्टीम पावर प्लँटसह २५ ते ३० हजार पौंडास मिळूं शकेल.

योजनेस चालू खेळत्या भांडवलासह ८–१० लाख रुपये लागतील. खासगी भागीदारींत अगर पब्लिक लिमिटेड कंपनी काढून करूं शकणाऱ्या व इच्छिणाऱ्या जबाबदार लोकांनीं यांत लक्ष घालून योजना शास्त्रोक्त व काळजीपूर्वक तयार केल्यास सहज यशस्वी होईल. यंत्रसामुग्री, प्रोसेस वगैरे संबंधीं कोणास अधिक माहिती हवी असल्यास ती लेखकाच्या पत्त्यावर मिळूं शकेल.

कोडचवाड तवनाप्पा
C/o बुडप्पा ईश्वरप्पा गाडवी,
रविवार पेठ, बेळगांव

---

## ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी.

## नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची तिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें रविवार ता. २४ जून सन १९५१ रोजीं दोन प्रहरीं ४–३० वाजतां खालील कामकाजाचा विचार करणेसाठी भरणार आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१–१२–१९५० अखेरचा हिशोब–तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटा-पत्रकें स्वीकारून त्यास मंजुरी देणें.

(२) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें धर्म-प्रकाश एल. एस. वेंकाजीराव, रा. ब. गणेश गोपाळ शेंबेकर व शापूर पापण्णा हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा पाळीप्रमाणें सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागासाठी उभे आहेत.

(३) चालूं सालासाठी ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(४) याखेरीज ऐनवेळीं जीं कामें चेअरमन सभेपुढें मांडतील त्यांचा विचार करणें.

कंपनीचीं शेअर ट्रान्स्फर बुकें ता. ११ जून ते २४ जून १९५१ अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

| | |
|---|---|
| ओगलेवाडी. | बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकमावरून |
| जि. उ. सातारा. | अेस. पी. ओगले आणि कं. |
| ता. २२ एप्रिल १९५१ | मॅनेजिंग अेजंटस |

---

सूचनाः—आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल असल्यास तो कृपाकरून कंपनीकडे सत्वर कळवावा.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

महाराष्ट्र सहकारी विद्यालय

पुणें १

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जुलै १९५१ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदीविक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंति देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९५१ च्या आंत अर्ज करावे.

वा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–५० अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,६०,४६५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ७५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

| | |
|---|---|
| सी. ह. जोशी, | वा. ग. चिरमुले, |
| बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | बी. ए., एलएल. बी., चेअरमन |

# ग्राहक सहकारी संस्थांची घटना व कार्यपद्धति

[ श्री. कु. ता. मंत्री, बी. ए., बी. टी., एल. सी. पी. (लंडन), डिप. एड. ( एडिं. )., जे. पी., ऑ. प्र. मॅजिस्ट्रेट,. बृहन्मुंबई ग्राहक सहकारी संस्था संघाचे अध्यक्ष, यांचें अखिल महिला परिषदेतर्फे चालविलेल्या बौद्धिक वर्गापुढें झालेलें व्याख्यान. ]

( १ )

ग्राहक सहकारी संस्थांची घटना व कार्यपद्धति हीं समजून घेण्यापूर्वीं त्यांचीं आधारभूत तत्त्वें आणि राष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेतील त्यांचें स्थान ही नीट समजून घेणें जरूर आहे.

### सहकारी चळवळीची व्यापकता

आपल्या या व्याख्यानमालेंतील आजपर्यन्त विद्वान् व्याख्यात्यांनीं दिलेली किंवा यापुढें दिलीं जाणारीं व्याख्यानें यांवरून राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेंत सहकारी पद्धतीचें क्षेत्र किती व्यापक आहे हें आपणांस कळून आलें असेलच, अगर कळून येईल. समाजजीवनाचें असें एकहि अंग नाहीं कीं तें कोणत्या ना कोणत्या तरी सहकारी प्रकाराच्या अवलंबनानें समृद्ध आणि सुखी करतां येणार नाहीं.

### ग्राहक सहकारी संस्थांचें वैशिष्ट्य

हें खरें असलें तरी ग्राहक सहकारी संस्थांचा जनतेच्या दैनंदिन जीवनावश्यक पदार्थांच्या उत्पादनाशीं व वाटपाशीं निकट संबंध येतो. यामुळें कोणत्याहि राष्ट्राच्या आर्थिक स्थैर्याचा विचार करीत असतांना ग्राहक सहकारी संस्थांना अग्रस्थान दिलें पाहिजे, हें मत आतां भारतांतहि प्रभावी होत चाललें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

### जुन्या पद्धतीचें वैफल्य

आणखी जी परिस्थिति या संस्थांच्या घटनेचा विचार करतांना ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं आतांपर्यन्त जीवनावश्यक पदार्थांचें उत्पादन व वांटप हीं खासगी व्यक्ति अगर कांहीं व्यक्तींचे गट किंवा कंपन्या यांच्या हातांत सर्वस्वी होतीं. त्यांचा मुख्य हेतु व्यक्तींचा किंवा व्यक्तिगटांचा नफा हा होता. सार्वजनिक हितदृष्टि त्याच्यांत मुळींच नव्हती असें नाहीं; तथापि ती प्रेरणा नव्हती. त्यांच्या कार्यानें समाजाच्या जविमगरजा भागत आहेत हें नाकारतां येणार नाहीं. परन्तु ही उत्पादन-संपादन-वांटप पद्धति बऱ्याच अंशीं तिच्या पूर्वीच्या मर्यादित लोकहितदृष्टीलाहि पारखी होत चालली आहे असें दिसून येईल. काळाबाजार, अनैतिक सांठे अगर तत्सम समाजविरोधी प्रवृत्ति हीं वरील पद्धतीच्या अधःपाताचीं लक्षणें आहेत. गतिमान् समाजाच्या समतेच्या आकांक्षांना तर ती अपुरीच पडली आहे.

### ग्राहक सहकारी संस्थांचीं बैठक व कार्यपद्धतीची पंचसूत्री

म्हणून, यापुढें समतेच्या पायावर लोकशाही पद्धतीनें आणि वाजवी नफ्यानें जनतेला त्यांच्या दैनंदिन वस्तू उत्पादन करून पुरवण्याचें कार्य ग्राहक सहकारी संस्थांनींच अंगीकारलें पाहिजे व त्यासाठीं अखिल देशांत या लोकशाही संस्थांचें संघटित जाळें निर्माण केलें पाहिजे. असें झालें तरच समाजजीवनांतील आज दिसून येणारी विषमता नष्ट होऊन तें समृद्ध आणि सुखी होऊं शकेल. यालाच आपण रामराज्य म्हणूं शकूं.

### सहकारी संस्थांची पंचसूत्री

ग्राहक सहकारी संस्थांच्या अंतिम ध्येयाची ही बैठक आहे. त्याचप्रमाणें बंधुभाव, त्याग, स्वावलंबन, चोख व्यवहार आणि निष्ठा हीं त्याच्या सिद्धीची पंचसूत्री आहे. कोणतीही ग्राहक संस्था, कोठेंहि स्थापन करावयाची असेल त्यावेळीं वरील बैठक आणि पंचसूत्री, कार्यकर्त्यांनीं नेहमीं आपल्या दृष्टीसमोर ठेवली पाहिजे. सहकारी चळवळीचे आद्य प्रवर्तक रॉशडेलचे अठ्ठावीस कामगार यांनीं आपली पहिली ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली त्यावेळीं हींच तत्त्वें आपल्या डोळ्यांसमोर ठेविलीं होतीं, हें आपणांस माहित असेलच हींच तत्त्वें आज सर्व राष्ट्रांनीं मान्य केलीं आहेत.

### जे ( २ ) पत्रक

ग्राहक सहकारी संस्थांच्या संघटनेचें तंत्र साधें आणि सुटसुटीत आहे. मुंबई राज्याच्या सहकारी संस्थांच्या रजिष्ट्रारनें या विषयावर एक मार्गदर्शक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. तिला " जे (२) पत्रक " हें नांव आहे त्याच्या जरूर त्या प्रती कार्यकर्त्यांस मोफत मिळतात. सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार संस्थांची घटना कशी करावी, कारभार कसा चालवावा, हिशोब कसे ठेवावे, संस्थेच्या सभासदांबरोबर वारंवार संयोग कसे घडवून आणावे, वगैरे गोष्टींविषयीं सुंदर मार्गदर्शन तींत केलें आहे. काल, परिस्थिति व ठिकाण यांना अनुसरून जरूर ते जुजबी फेरफार करून प्रत्येक संस्थेच्या कार्यकर्त्यांना एक नियमावलि तयार करणें सोपें आहे. या पत्रकाच्या आरंभीं सहकारी पद्धतीचीं मूलतत्त्वें व अनुभव दिले आहेत, त्यांचा प्रत्येक कार्यकर्त्यानें अभ्यास करावा.

### ग्राहक सहकारी संस्था कशा स्थापाव्या

ग्राहक सहकारी संस्थांचें कार्य आपापल्या सभासदांना व इतर गिऱ्हाइकांना संसारोपयोगी वस्तू आणून त्या पुरवणें हें आहे. या वस्तू पुरवण्याचा हेतु नफा मिळवणें हा नसून उलट खासगी व्यापारी अथवा दलाल यांच्या खिशांत पडणारा नफा शक्य तितका गिऱ्हाइकांच्या पदरांत टाकणें हा आहे.

या हेतूच्या पूर्तीसाठीं ग्राहक सहकारी संस्थांनीं, सहकारी तत्त्वावर संघटितपणें जीवनावश्यक वस्तू पुरवणारीं दुकानें चालवणें जरूर आहे.

ग्राहक सहकारी संस्था स्थापन करणें, त्यांच्यामार्फत दुकानें चालवणें अगर कांहीं पदार्थांचें उत्पादन करणें व त्या सहकारी दुकानांना पुरवणें याबाबतचें तंत्र कायद्यानें घालून दिलें आहे. त्याची रूपरेषा साधारणपणें अशी आहे. कांहीं जनसेवोत्सुक व कल्पकता असलेले कार्यकर्ते बहुतेक ठिकाणीं असतातच. त्यांना लोकांच्या धान्यविषयक, वस्त्रविषयक गरजा दिसतात व त्या भागवण्याचा प्रयत्न करण्याचा ते स्वयंप्रेरणेनें निर्णय घेतात. अशा रीतीनें संस्था स्थापन होते व तीमार्फत एखादें दुकान-स्टोअर्स स्थापन होते. त्याची भरभराट ही त्या कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेवर, सचोटीवर व त्यागावर अवलंबून असते हें सर्वांना परिचित आहेच.

असा निर्णय घेतल्यावर कांहीं गोष्टी ध्यानांत ठेवणें जरूर आहे, त्या अशाः—

१. आपल्या कार्यक्षेत्राचा किंवा लोकसंख्येचा फार मोठा पसारा आरंभीं अंगावर घेऊं नये. सुरवात मर्यादित पदार्थांपासून करून क्रमाक्रमानें वाढवीत जाणें बरें.

२. वरीलप्रमाणें सुरवात केल्यास एका अन्नधान्य दुकानास सुमारें ५,००० रु. भांडवल लागेल.

३. हें भांडवल लहान लहान भागांनीं उभारावें. स्थानिक जनतेच्या सामान्य आर्थिक परिस्थितीनुसार ५, १०, २५ रुपयांचा प्रत्येक भाग असावा. भाग लहान ठेवून प्रत्येक व्यक्तीस संस्थेचें भागीदार होण्याची संधि देणें हें सहकारी पद्धतीचें मूलभूत तत्त्व आहे. कांहीं व्यक्तींना एकाहून अधिक भाग घेऊं द्यावे. मात्र प्रत्येक व्यक्तीनें कमाल भाग किती घ्यावे हें नियमावलींत ठरवून ठेवावें. नाहींतर स्वार्थी दोन–चार माणसेंच सर्व भाग घेऊन टाकतील, हें सहकारी तत्त्वाशीं विसंगत आहे.


४. दुकानाची जागा, विक्रेते, व्यवस्थापक, भांडवल इत्यादि आरंभिक व्यवस्था झाली कीं संस्थेच्या कार्याची नियमावलि तयार करून औपचारिक रीत्या संस्थेची स्थापना करावी, तिच्याकडून ती नियमावलि संमत करून घ्यावी, तिची अंमलबजावणी करण्यासाठीं एक व्यवस्थापक मंडळ नेमावें, व ती नियमावलि सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार यांजकडे संस्था रजिस्टर करण्यासाठी सादर करावी. संस्था रजिस्टर झाल्यानन्तर दुकान किंवा दुकानें यांचा व्यवहार रीतसर सुरू करावा.

## कारभार पद्धति

५. संस्थेचा कारभार हा भागीदारांनीं निवडलेल्या सभासदांच्या व्यवस्थापक मंडळाकडे असतो. हें व्यवस्थापक मंडळ अगदीं लहान नसावें, तसेंच तें फार मोठेंहि नसावें. अनुभवांतीं ९ ते ११ सभासदांचें व्यवस्थापक मंडळ व्यवहार्य ठरतें, असें आढळून आलें आहे. व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व चिटणीस हे संस्थेच्या यशाचे व उन्नतीचे आधारस्तंभ आहेत. म्हणून त्यांची निवड करतांना शिक्षण, नेकी, त्याग, कळकळ व समाजांतील त्यांचें वजन या गोष्टींचा प्रामुख्यानें विचार करावा. अध्यक्ष व चिटणीसच वरील लायकीचे असून भागणार नाहीं. सर्वच सभासद कमी–अधिक प्रमाणांत वरील लायकीचे असले पाहिजेत. त्यांना आठवड्यांतून चार–पांच तास तरी संस्थेच्या कार्याशीं निकट संबंध राखतां आला पाहिजे; कारभारांतील आपला भाग पार पाडतां आला पाहिजे.

६. सहकारी संस्था ही लोकशाहीचा एक उत्तम नमुना आहे व लोकशाहीच्या तत्त्वानुसार तिचा कारभार बहुमतानें चालावा हें योग्यच आहे. पण शक्य तितका तो खेळीमेळीनें व एकमतानें करणें हें बरें. व्यवस्थापक मंडळाच्या सभा जितक्या वारंवार होतील तितकें चांगलें. सभासद मंडळाशींहि शक्य तितका वारंवार संयोग घडवून आणावा. यासाठीं कोणी त्रैमासिक सभा भरवतात, संमेलनें घडवून आणतात अथवा संस्थेचा वाढदिवस साजरा करतात. हे परिचय संबंध चांगले आहेत. या कार्यक्रमांत संस्थेच्या प्रगतीचा अनौपचारिकपणें आढावा घेणें, नवीन योजना असतील तर त्यांची सभासदांना माहिती देणें, त्यांचीं मतें ऐकून घेणें, यांना अवश्य स्थान असलें पाहिजे. सभासदांनीं मोकळेपणानें जशी टीका करणें योग्य, तशीच व्यवस्थापक मंडळाच्या प्रशंसनीय कामगिरीची प्रशंसा करणेंहि योग्यच. व्यवस्थापक मंडळानें प्रतिकूल टीकेनें आपल्या मनाचा तोल जाऊं देण्याचें कारण नाहीं. कारण टीका आणि प्रशंसा ही दोन्ही संस्थेच्या यशाला सारखीच पोषक ठरतात हें विसरतां कामा नये.

[ अपूर्ण ]


# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३२१५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } १९५।१९६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी ' दुर्गाधिवास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.